# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक ०२.०९.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०१.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०४ ईसमावर कारवाई करून एकुण २६,३८८/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०१ केसेसमध्ये ०५ इसमांवर कारवाई करून एकुण १,२८०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,२५५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ६,३५,५००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ०१.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०२.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०३ ईसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) परिमंडळ क्र. ६ अंतर्गत, पोलीस ठाणे कोराडी येथील कुख्यात गुंड हद्दपार :—**

पोलीस ठाणे कोराडी हददीत **सेक्टर नं. १२, श्रीकृष्णधाम झोपडपट्टी, वॉक्स कुलर मागे, कोराडी, नागपूर येथे राहणारा गुन्हेगार ईसम नामे आतीष उर्फ ऑस्टीन रॉबर्ट फ्रान्सीस, वय २८ वर्षे** याचेविरूध्द पोलीस ठाणे कोराडी येथे खुनाचा प्रयत्न करणे, दुखापत करणे, बेकायदेशिर जमाव करणे, शस्त्र बाळगणे इत्यादी गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता कोराडी पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०६, नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०६, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. ११/२०२६ दिनांक २१.०८.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला. नमुद गुन्हेगाराचे हद्दपार आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली असुन, कोराडी पोलीसांनी नमुद हद्दपार इसमास दिनांक ०१.०९.२०२६ रोजी जि. भंडारा येथे त्याचे नातेवाईक यांचेकडे सोडलेले आहे.

**३) हिंगणा पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक, वाहनचोरी व घरफोडीचे एकुण ०७ गुन्हे उघडकीस.**

दिनांक २५.०८.२०२६ चे २२.३० वा. ते दिनांक २६.०८.२०२६ चे ०८.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी अनिल चरणबाबु चानपुरकर, वय ४९ वर्षे, रा. वार्ड नं. ४, रायपुर, तह. हिंगणा, जि. नागपुर यांनी त्यांचे पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, धनगरपुरा रोडवरील व्हि.ए. चानपुरकर नावाचे देशी दारूचे दुकान बंद करून आपले घरी

गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानाचे मुख्य दाराची तसेच, आतील दाराची कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, दुकानाचे काऊंटरमधील रोख ४१,६००/—रू. चोरून नेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान हिंगणा पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून, आरोपीचे मिळालेल्या वर्णनावरून व खात्रीशीर माहीतीवरून, आरोपीस निष्पन्न केले. आरोपी नामे राहुल शिवदास राठोड, वय २४ वर्षे, रा. शिरपुर, तह. खकनार, जि. बुऱ्हाणपुर, मध्यप्रदेश, ह.मु.— देशमुखवाडी, हिंगणा, फटींगचे घरी किरायाने, नागपुर यास ताब्यात घेवुन, विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीला अधिक सखोल विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत ईतर ०५ घरफोडीचे व ०१ वाहन चोरीचा असे एकुण ०७ गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्ह्यातील रोख ३९,८००/—रू, व सर्व गुन्ह्यातील वेगवेगळे सोने—चांदीचे दागिने व भांडे, तसेच, युनिकॉर्न मोटारसायकल क्र. एमएच ३१ सिडी६८८३ असा एकुण २,४७,९३३/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीकडुन एकुण ०७ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषीकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. जितेंद्र बोबडे, पोउपनि. संतोष राठोड, पोहवा. कैलास चव्हाण, अरूण कांबे, नापोअं. अतुल तलमले, पोअं. कार्तीक हेडाऊ, अनिल झाडे व प्रणित बंड यांनी केली.



**४) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक ०१.०९.२०२६ चे २३.०० वा. ते ०२.०९.२०२६ चे ०१.४० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे पाचपावली हद्यीत पेट्रोलींग करीत असतांना, सार्वजनिक सिमेंट रोड लगत, मुस्लीम कब्रस्तान समोर, ताज नगर, टेका येथे हयुंदाई कार व ऑटो जवळ काही ईसम संशयीतरित्या दिसल्याने, त्यांना ताब्यात घेऊन त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी आपली नावे १) शेख ईम्रान उर्फ बाबा शेख मुख्तार, वय ३८ वर्षे, रा. आशामनी अपार्टमेंट समोर, जाफर नगर, गिट्टीखदान, नागपूर २) शेख आबिद उर्फ आबु शेख अन्वर, वय ३४ वर्षे, रा. गुटकाला तलाव परीसर चंद्रपुर, ३) फैजान रजा अब्दुल जब्बार शेख, वय ३१ वर्षे, रा. सेंट्रल जेल मागे, दादमालवाड, चंद्रपुर ४) मोहम्मद जुनैद मोहम्मद ईब्राहीम राजवाडी, वय ३३ वर्षे, रा. मंगलशहा बाबा दर्गाह जवळ, वनदेवी नगर, यशोधरानगर, नागपूर असे सांगितले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्यातील तरतुदींचे तंतोतंत

पालन करुन, पंचासमक्ष त्यांची व वाहनाची झडती घेतली असता, त्यांचे ताब्यात अंमली पदार्थ हिरव्या रंगाचा गांजा एकुण वजनी २० किलो ५८५ ग्रॅम किंमती १०,२८,२५०/—रू. चा मिळुन आला. आरोपींचे ताब्यातुन रोख ६,५००/—रू., गांजा, ह्युंदाई कार क्र. एमएच ०१ एएक्स १७०९, मॅक्झीमा ऑटो क्र. एमएच ४९—८७५८ व ०४ मोबाईल फोन असा एकुण १८,१५,७५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी त्यांचा साथीदार पाहीजे आरोपी नामे हॅप्पी उर्फ पाजी उर्फ हरप्रीत सैनी, रा. जयविजय सोसायटी, दिक्षित नगर, यशोधरानगर याचे मदतीने विक्रीकरीता गांजा आणल्याचे सांगीतले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii)(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने आरोपींविरूध्द पोलीस ठाणे पाचपावली येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पाचपावली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षीरसागर, पोउपनि. नागेश पुन्नावाड व त्यांचे पथकाने केली.



**<u>५) गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथकाची कामगिरी :— वाहनचोरीचे ०२ गुन्हे उघडकीस, ०२ आरोपींना अटक.</u>**

**अ)** दिनांक २६.०८.२०२६ चे २१.०० वा. ते दिनांक २७.०८.२०२६ चे ०७.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत सरोदी मोहल्ला, हिंगणा रोड, चेतन कटीया भंडार जवळ राहणारे फिर्यादी रोहीदास प्रभाकर कोटे, वय ३५ वर्षे यांनी त्यांचा बजाज कंपनीचा तिनचाकी ऑटोरिक्षा क्र. एम.एच. ४९ एआर ०७७५ किंमती १,३०,०००/—रू. चा आपले घरासमोर लॉक करून, पार्क करून ठेवला असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचा ऑटा चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपीस निष्पन्न केले. आरोपी नामे निलेश उर्फ निलु राजेंद्र सोनवणे, वय २६ वर्षे, रा. कालीमाता मंदीर समोर, लक्ष्मीनगर, मानकापुर, नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्ह्यातील चोरी केलेला ऑटोरिक्षा किंमती १,३०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव एमआयडीसी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

**ब)** दिनांक २५.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २६.०८.२०२६ चे ०६.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीत व्हि.एच.बि. कॉलोनी, क्वॉर्टर नं. आय/१२ येथे राहणारे फिर्यादी अंश अजय

बैस, वय २२ वर्षे यांनी त्यांची रॉयल इन्फील्ड दुचाकी क्र. एम.एच. ४० बि.झेड ३७७८ किंमती १,७५,०००/—रू. ची आपले घरासमोर लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे शांतीनगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपीस निष्पन्न केले. आरोपी नामे विनोद उर्फ गद्दु राजु लांजेवार, वय २६ वर्षे, रा. कौशल नगर, पिवळी नदी, कामठी रोड, नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने त्याचे साथीदार पाहीजे १) विक्की योगेश डेहेरीया वय २२ वर्षे, रा. इंदीरामाता नगर, यशोधरानगर २) पियुष दिपक निमजे, वय १८ वर्षे, रा. धम्मदीप नगर, यशोधरानगर यांचेसह संगणमत करून वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्ह्यातील चोरी केलेली दुचाकी किंमती १,७५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव शांतीनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील दोन्हीही कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. रविंद्र नाईकवाड, पोहवा. विलास कोकाटे, रोशन तिवारी, अजय शुक्ला, सचिन बढीये, नितीन वर्मा, पोअं. राहुल कुसरामे व अभय ढोणे यांनी केली.





**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे अंबाझरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २२.०८.२०२६ चे १६.४०० वा. ते दिनांक ०१.०९.२०२६ चे ११.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत २१०, साईकृपा अपार्टमेंट, गोकुळपेठ, कॅनल रोड, नागपूर येथे फिर्यादीची बांधकाम साईड चालु असुन, त्यांनी ईलेक्ट्रीक फिटींग करीता लागणारे पॉलीकॅब कंपनीचे वेगवेगळ्या एम.एम चे २८ बंडल वायर एकुण किंमती १,६७,८००/—रू. चा मुद्देमाल आणुन बांधकाम साईडवरील गोडावुनमध्ये लॉक करून ठेवला होता. कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे बांधकाम साईडचे गोडावुन चे लॉक तोडुन, आंत प्रवेश करून, ईलेक्ट्रीक फिटींगचे वायर बंडल चोरून नेल्याचे सिसिटीव्ही मध्ये दिसुन आले.

याप्रकरणी फिर्यादी अश्वीन कमलेश कटरे, वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं. २०, न्यु जरीपटका, नारा रोड, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे मपोउपनि. शारदा भोपाळे ८६९१०४०४८३ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे कोराडी</u> :–** दिनांक ०१.०९.२०२६ चे २०.३५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत कोराडी पॉवरप्लांट क्र. ५ मध्ये खाली मारोती मारोराम मेश्राम, वय ६१ वर्षे, रा. माहुरकुडा, अर्जुनी–मोरगांव, जि. गोंदीया, ह.मु. नांदा फाटा, कोराडी, नागपुर हे काम करीत असतांना, त्यांचे अंगावर वरून रॅक पडल्याने ते जखमी झाले. सोबत काम करणारे वर्कर यांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी तपासुन त्यांना मृत घोषीत केले.

यापकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे कोराडी येथे पोउपनि. चव्हाण यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे अजनी</u> :–** श्रीमती सुर्यकांता गजानन बावणे, वय ५३ वर्षे, रा. प्लॉट नं. २५, बजरंग नगर, राऊत चे घरी किरायाने, अजनी, नागपूर ह्या दिनांक १४.०८.२०२६ चे ०९.०० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–सडपातळ, उंची–४ फुट १० इंच, डोळे–काळे, केस–काळे/पांढरे लांब, अंगात– सलवार सुट घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. ओळख– डाव्या हाताचे मनगटावर विंचु चे चित्र गोंदलेले आहे.



श्रीमती सुर्यकांता

**(ईतर)**

**<u>१) आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. २६ वे दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्तर तथा अती. मुख्य न्यायदंडाधिकारी,नागपुर | २२१९/२० २६ | कलम १३८ एन.आय. ॲक्ट | पियुष राजु कोरेकर, रा. प्लॉट नं. ५०९, जुना बगडगंज, दरोगा मैदान, मोना बारमागे, नागपुर. | २९.०९.२०२६ |
| २. | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | २६४६/२० १६ | कलम ३९२, ३४ भा.दं.वि. | १) महेंद्र उर्फ माल्या सेवकराम मेंढे, २) सद्दाम हुसैन औरंगजेब हुसैन अन्सारी, दोन्हीही रा. शामनगर, गायत्री किराणा जवळ, नागपुर. | २९.०९.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **३.** | मा. १६ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३००८५३/ २०१५ | कलम ७० सिआरपिसी प्रमाणे (अटकेचा वॉरन्ट) | १) छोटु सोनविरसिंग बिडला, २) सोनु सोनविरसिंग बिडला, ३) नितु ओमसिंग बिडला, ४) मोहीतकुमार सोनविरसिंग बिडला, चौघेही रा. जगनपुर, कैराना, जि. शामली (उत्तर प्रदेश), ह.मु.—मिनीमाता नगर, पाचझोपडा, भंडारीचे घरी किरायाने,कळमना, नागपुर. ५) सोनु पारचा महेंद्र पारचा, रा. त्रिलोकपुरा सेक्टर नं. ५, घर नं. ९४५, कल्याणपुरी, दिल्ली, ह.मु.—मिनीमाता नगर, पाचझोपडा, भंडारीचे घरी किरायाने,कळमना, नागपुर. ६) रविकुमार रामपालकुमार, रा. रोहीणी सेक्टर नं. २०, घर नं. ५९६, दिल्ली. ह.मु.—मिनीमाता नगर, पाचझोपडा, भंडारीचे घरी किरायाने,कळमना, नागपुर. ७) मनोजसिंग प्रभुसिंग, रा. त्रिलोकपुरा सेक्टर नं. ५, घर नं. ५२०, कल्याणपुरी, दिल्ली, ह.मु.—मिनीमाता नगर, पाचझोपडा, भंडारीचे घरी किरायाने,कळमना, नागपुर. ८) अमीतकुमार ओमसिंगकुमार, रा. रोहीणी सेक्टर नं. ४, घर नं. १०१५, दिल्ली, ह.मु. —मिनीमाता नगर, पाचझोपडा, भंडारीचे घरी किरायाने,कळमना, नागपुर. | २२.०९.२०२६ |

**२) प्रामाणिक ऑटोचालक यांचा सत्कार :—**

पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत दिनांक ३१.०८.२०२६ रोजी, तक्रारदार श्रीमती ममता नरेश यादव, रा. प्लॉट नं. २०५, श्रीकृष्ण अपार्टमेंट, यादव नगर यांनी तक्रार दिली की, त्या जुन्या मोटारस्टॅण्ड चौक, अमर टॉकीज समोर खरेदी करीता गेल्या असता, त्यांची रोख १,७५,०००/—रू. सोन्याची अंगठी, मोबाईल फोन व

०३ एटीएम डेबीट कार्ड असा एकुण ४,७५,०००/—रू. चा मुद्देमाल असलेली बॅग हरविलेली आहे. लकडगंज पोलीस तपास करीत असतांना, दिनांक ०१.०९.२०२६ रोजी ऑटोरिक्षा चालक नामे सचिन मोतीरामजी निखारे, वय ४० वर्षे, रा. विनोबा भावे नगर, गांधी पुतळ्या जवळ, गल्ली नं. १० यांनी पोलीस ठाणे लकडगंज येथे येवुन, वरील हरविलेली संपुर्ण मुद्देमाल असलेली बॅग आणुन परत दिली. ऑटोचालक सचिन निखारे यांनी निस्वार्थ व अत्यंत प्रामाणिकपणे मुद्देमाल असलेली बॅग परत आणुन बॅग तक्रारदार श्रीमती ममता यादव यांना परत दिल्याने लकडगंज पोलीसांनी त्यांचा सत्कार करून त्यांना प्रशस्तीपत्र देवुन त्यांचा गौरव केला.



**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**